पेसा कायदयांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील नामनिर्देशनाद्वारे केली जाणारी भरती व जिल्हांतर्गत करण्यात येणाऱ्या बदल्या याबाबतच्या मार्गदर्शक सूचना..........

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-५०१६/प्र.क्र.४४४/आस्था-८,**
**बांधकाम भवन, फोर्ट, २५- मर्झबान पथ**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१,**
**दिनांक : २३ जुलै , २०१८.**

**प्रस्तावना:-**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबत दिनांक १५ मे, २०१४ च्या शासन निर्णयांन्वये मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत. त्यानंतर शिक्षक संवर्गासाठी दिनांक २४ एप्रिल,२०१७ च्या शासन निर्णयांन्वये मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत.

२. अनुसूचित क्षेत्रासाठी मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन, यांच्या दिनांक ०९.०६.२०१४ च्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रामध्ये (पेसा) सरळसेवेने भरावयाची पदे स्थानिक अनुसूचित जमातीमधील उमेदवारांमधुनच भरण्याचे आदेशित केले आहे. त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाने अनुसूचित क्षेत्रातील १७ संवर्गातील पदे ( दिनांक ०९.०६.२०१४ च्या अधिसूचनेनुसार समाविष्ट केलेली पदे धरुन) स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधुन भरण्याच्या अनुषंगाने करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत दिनांक ०५ मार्च,२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. तसेच दिनांक २६ जून,२०१५ रोजी शासन शुध्दीपत्रकाद्वारे अनुसूचित क्षेत्रातील पदे स्थानिक आदिवासी मधुन भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना विहीत केलेल्या आहेत.

३. सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत सर्वसाधारण बदल्यांच्या धोरणाची

अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणींबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी शासनाकडे मार्गदर्शन मिळण्याची विनंती केली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी केलेल्या मागणीवर सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात येऊन आता अनुसूचित क्षेत्र असणाऱ्या जिल्हयांमधील नामनिर्देशनाद्वारे केली जाणारी भरती व जिल्हांतर्गत बदली या संदर्भात सुधारित मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

<u>नामनिर्देशनाने होणाऱ्या भरतीबाबत</u> :-

१. सदर भरतीबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०५ मार्च, २०१५ आणि दिनांक २६ जून, २०१५च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे. सदरचे शासन निर्णय हे मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य याच्या दिनांक ०९ जून, २०१४ च्या अधिसूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक ०९ जून, २०१४ च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्हयामधील अनुसूचित क्षेत्रामधील विशिष्ट संवर्गाच्या पदांपैकी सरळ सेवेने भरावयाची सर्व पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारातूनच भरणे बंधनकारक आहे. सदर अधिसूचनेमध्ये नमूद केलेले हे विशिष्ट संवर्ग म्हणजे ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, शिक्षक, पशुधन पर्यवेक्षक, आरोग्य सेवक (महिला), आरोग्य सेवक (पुरुष) कर्मचारी हे होय.

३. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने दिनांक ०५ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाने करावयाच्या कार्यवाहीबद्दल सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार :-

i) अनुसूचित क्षेत्रातील जिल्हयांमध्ये ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली या

जिल्हयांचा समावेश होतो. सदर जिल्हयांमध्ये असणाऱ्या तालुका निहाय गावांची यादी आदिवासी विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

ii) यानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रथमत: उपरोक्त नमूद ६ संवर्गात मंजूर असलेल्या पदांची अनुसूचित क्षेत्रात व अनुसूचित क्षेत्राबाहेर अशा दोन भागात विभागणी करावी. तद्नंतर अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या मंजूर पदांची व कार्यरत पदांची संख्या निश्चित करावी.

iii) अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदांवर स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारातून प्राधान्याने पदभरती करण्यात यावी. यासाठी अनुसूचित क्षेत्राबाहेर कार्यरत असणाऱ्या स्थानिक अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यास प्रथम अनुसूचित क्षेत्रात जाण्यास इच्छूक आहेत किंवा नाहीत याबाबत त्यांचा विकल्प घ्यावा. अनुसूचित क्षेत्राबाहेर कार्यरत असणाऱ्या स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांनी अनुसूचित क्षेत्रात काम करण्याचा विकल्प दिल्यास अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे प्रथम त्यांच्यामधून भरण्यात यावीत.

iv) वरीलप्रमाणे विकल्पानुसार पदभरती केल्यानंतर अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे ही जाहिरातीद्वारे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधून भरण्यात यावीत. त्यापैकी एक तृतीयांश पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील महिला उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

v) उपरोक्त नमूद संवर्गातील अनुसूचित क्षेत्रातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरावयाची आहेत. तसेच दिनांक ५ मार्च,२०१५ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित क्षेत्राबाहेरील उपरोक्त नमूद पदांसाठी अनुसूचित जमातीसाठी असणारे आरक्षण हे ७ टक्के लागू करण्यात आले आहे.

vi) उपरोक्त संवर्गांसाठी अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीची सर्व पदे भरेपर्यंत त्या त्या संवर्गासाठी एकच बिंदू नामावली ठेवण्यात यावी. सदर बिंदू नामावलीनुसार रिक्त होणाऱ्या पदांपैकी अनुसूचित क्षेत्रातील रिक्त होणारी पदे परंतू, जिल्हयातील एकुण रिक्त पदांच्या जास्तीत जास्त २०टक्के पदे ही

अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांमधून भरावयाची आहेत. उर्वरित पदांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०५ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित आरक्षण लावून त्यानुसार सदर पदे अनुसूचित क्षेत्राबाहेर भरण्यात यावीत.

vii) अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधून ज्याप्रमाणे भरली जातील त्या उमेदवारांची वर्षनिहाय स्वतंत्र यादी करुन त्यांच्या नावासमोर स्थानिक अनुसूचित जमाती असा शेरा लिहावा. तसेच अनुसूचित क्षेत्राबाहेरील पदांवर अनुज्ञेय आरक्षणानुसार भरण्यात येणाऱ्या उमेदवारांची देखील वर्षनिहाय व प्रवर्गनिहाय स्वतंत्र यादी ठेवण्यात यावी. अशाप्रकारे सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०५ मार्च, २०१५ अन्वये अनुसूचित क्षेत्रामधील व अनुसूचित क्षेत्राबाहेर नामनिर्देशनाने करावयाच्या भरतीची कार्यवाही करण्यात यावी.

४. <u>बदलीबाबत करावयाची कार्यवाही :-</u>

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांच्या दिनांक ०९ जून, २०१४ च्या अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्हयामधील अनुसूचित क्षेत्रातील उपरोक्त नमूद ६ संवर्गातील पदे (ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, शिक्षक, पशुधन पर्यवेक्षक,आरोग्य सेवक (महिला), आरोग्य सेवक ( पुरुष) ) नामनिर्देशनाने भरताना स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारातून भरावयाची आहेत.

२. उपरोक्त तरतूद करण्यामागे प्रमुख उद्देश हा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४६ नुसार शासनावर अनुसूचित जमातीचे शैक्षणिक आणि आर्थिक हित विशेष काळजीपुर्वक जोपासण्याचे कर्तव्य सोपविले आहे. परंतू अनुसूचित क्षेत्रात कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, कार्यालयातील उपस्थितीचे कमी प्रमाण यामुळे सेवा पुरविण्यात अडचणी निर्माण होत होत्या. या आणि इतर अनुषंगिक बाबी विचारात घेऊन ही तरतूद करण्यात आलेली आहे.

३. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ जून, २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे बिंदूनामावलीनुसार रिक्त होणाऱ्या पदांपैकी पदभरती करीत असताना अनुसूचित क्षेत्रात रिक्त होणारी पदे परंतू जास्तीत जास्त जिल्हयातील एकूण रिक्त पदांच्या २० टक्के पदे ही अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांमधून भरावयाची आहेत.

४. परंतू जिल्हांतर्गत कर्मचाऱ्यांची बदली करीत असताना या बदलीमुळे जिल्हयाच्या बिंदू नामावली अथवा जिल्हयाच्या असणाऱ्या रिक्त पदांमध्ये कोणत्याही प्रकारे फरक पडत नाही. नियुक्त्या, सेवानिवृत्ती यामुळे जिल्हयाच्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होत असतो.

५. राज्यातील अनुसूचित क्षेत्रात निम्न मानव विकास निर्देशांक, मागासलेपणा, दुर्गमता, गरिबी दिसून येते. अनुसूचित क्षेत्राचे सामाजिक निर्देशांक हे राज्याच्या सामाजिक निर्देशांकाच्या प्रमाणात कमी आहे. यामुळे अनुसूचित क्षेत्राच्या ठिकाणी कोणत्याही कारणामुळे पद रिक्त राहिल्यास सेवासुविधा पुरविण्यामध्ये अथवा त्यांच्या दर्जामध्ये सातत्य राखण्यामध्ये अडथळा येऊ शकतो व ही बाब मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य याच्या दिनांक ०९ जून, २०१४ च्या अधिसूचनेशी विसंगत होईल.

६. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक ३२७८/२०१० मध्ये दिलेल्या आदेशान्वये ( दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ आणि दिनांक २१ नोव्हेंबर,२०१२ ) आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील पदे प्राधान्याने भरावयाची आहेत.

७. वरील सर्व बाबींचा विचार करता बदलीसंदर्भात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे-

(अ) स्थानिक अनुसुचित जमातीच्या उमेदवारांच्या बदलीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

i) जे स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार हे मा. राज्यपाल यांच्या दिनांक ९ जुन, २०१४ च्या अधिसूचनेप्रमाणे जाहीरात देऊन स्थानिक विविक्षीत अनुसुचित क्षेत्रासाठी स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करण्यात आलेली आहे. अशा उमेदवारांची नियुक्ती ही अनुसूचित क्षेत्रापुरती मर्यादित राहील व त्या क्षेत्राबाहेर त्यांची बदली केली जाणार नाही. परंतु त्या क्षेत्रामध्ये त्यांची अंतर्गत बदली करता येईल.

ii) सध्या कार्यरत असलेले अनुसूचित जमातीचे कर्मचारी व यापुढेही सरळसेवेने नियुक्ती दिली जाणारे नियमित कोटयातील अनुसूचित जमातीचे कर्मचारी यांची बदली करतांना ते स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील असल्यास त्यांच्याकडून विकल्प घेण्यात यावा. सदर विकल्पाप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांना ते स्थानिक अनुसूचित जमातीचे समजण्याबाबत विकल्प दिल्यास त्यांना स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार म्हणून समजण्यात यावे. त्यामुळे त्यानंतर त्यांना त्यांच्या विकल्पाप्रमाणे अनुसूचित क्षेत्रामध्ये नियुक्ती देण्यात येईल. या क्षेत्राबाहेर ते बदलीस पात्र असणार नाहीत. त्या अनुक्षेत्रांतर्गतच त्यांची बदली केली जाईल व अशा प्रकारे एकदा दिलेला विकल्प त्यांना पुन्हा बदलता येणार नाही.

(ब) स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांव्यतिरीक्त इतर कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदलीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांव्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदलीसाठी संपूर्ण जिल्हा हे कार्यक्षेत्र राहील. अशा कर्मचाऱ्यांची बदली जिल्हयामध्ये कोणत्याही ठिकाणी करता येईल. फक्त अशी बदली करीत असतांना, स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार कार्यरत असणाऱ्या पदांवर त्यांना बदलीने नियुक्ती देता येणार नाही.

सदरचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४६/१८ए/१६ब दि .३१/१/२०१८ नुसार दिलेल्या अभिप्रायास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०७२३१७२२०८७४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2018.07.25 12:46:36 +05'30'

**( प्रि.शं.कांबळे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.

सर्व उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्तांचे कार्यालय.

सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद.

जिल्हा परिषद (आस्थापना) सर्व कार्यासने/निवडनस्ती (आस्था-८).